महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वाी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.५६९/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**प्रशासकीय परिपत्रक क्र. ५२९ दिनांक २१ / ०१ / २०१६**

विषय : महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.म. मधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

वाचा : १) प्रशासकीय परिपत्रक क्र.५१९ दि.२०.१०.२०१५.
२) शासन निर्णय क्र.मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५.०१.२०१६.

......

महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.मभवा-२०१५/प्र.क्र.४२/सेवा-९, दि.१५.१०.२०१५ अनुसार वेतनश्रेणीतील मूळ वेतनाच्या ११३ % या दराने महागाई भत्ता म.रा.वि.वितरण कंपनीतील कर्मचाऱ्यांना प्रशासकीय परिपत्रक क्र.५१९ दि.२०.१०.२०१५ अनुसार दि.०१.०१.२०१५ पासून लागू करण्यात आला असून महागाई भत्ता दि.०१.०२.२०१५ पासून देण्यात आला आहे.

२. आता राज्य शासनाच्या वित्त विभागाने शासन निर्णय क्र.मभवा-१११५/प्र.क्र.४२/सेवा-९ दि.१५.०१.२०१६ अन्वये राज्य शासकीय व इतर कर्मचारी तसेच ज्यांना महागाई भत्ता अनुज्ञेय आहे अशा सर्व पूर्णकालीक कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१५ ते दि.३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्यात यावी असे आदेश दिले आहेत.

३. शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दि.०१ जानेवारी २०१५ ते दि.३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (प्रकल्प) व संचालक (संचलन) यांचेशी विचारविनिमय करून मंजुरी प्रदान केली आहे.

४. परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे माहे जानेवारी २०१५ ते सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी २०१६ च्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्यात यावी.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

D:\O&M\D.A-Adm.Circula

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.९/ ०२९३६
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

दिनांक : **२२ / ०१ / २०१६**

# शुद्धीपत्र

(प्रशासकीय परिपत्रक क्र.५२९ दि. २१.०१.२०१६)

विषय : महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार म.रा.वि.वि.कं.म. मधील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम देण्याबाबत.

......

शासनाच्या धर्तीवर म.रा.वि.वि.कं.मर्यादित मधील सर्व कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी २०१५ ते दिनांक ३० सप्टेंबर २०१५ या कालावधीतील महागाई भत्त्याच्या थकबाकीची रक्कम माहे जानेवारी २०१६ च्या वेतनामध्ये समाविष्ट करुन देण्याबाबतच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. सदर प्रशासकीय परिपत्रकातील परिच्छेद क्र. १ मधील चौथ्या ओळीत नमूद केलेली दि. ०१.०२.२०१५ ही तारीख दि. ०१.१०.२०१५ अशी वाचण्यात यावी.

३. सदर शुद्धीपत्र महावितरण कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

२२/१/१६.

**( संदेश हाके )**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**